


सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक २०४ • मंगळवार दि.१२ मे २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.

## पेपरफुटीमुळे नीट परीक्षा रद्द;देशभरात खळबळ

### लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला




नवी दिल्ली:देशातील वैद्यकीय शिक्षणासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाणारी नीट परीक्षा २०२६ अखेर रद्द करण्यात आल्या आहेत. त्यामुळे देशभरातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड संताप आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. पेपरफुटीच्या गंभीर आरोपांनंतर केंद्रीय तपास यंत्रणा सीबीआयने हस्तक्षेप करत संपूर्ण परीक्षा प्रक्रियेलाच स्थगिती देण्याचे आदेश दिले. त्यामुळे आता नीट परीक्षा पुन्हा कधी होणार? हा प्रश्न लाखो विद्यार्थ्यांसमोर उभा ठाकला आहे.

वैद्यकीय प्रवेशासाठी देशभरात ३ मे रोजी घेण्यात आलेल्या नीट परीक्षेनंतर अनेक राज्यांतून पेपरफुटीच्या तक्रारी समोर येऊ लागल्या होत्या. विशेषतः राजस्थानमध्ये मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाल्याचा आरोप करण्यात आला. या प्रकरणाची व्याप्ती वाढत गेल्यानंतर अखेर परीक्षा रद्द करण्याचा मोठा निर्णय घेण्यात आला.सीबीआयने स्पष्ट शब्दांत सांगितले की, पेपरफुटी प्रकरणाचा सखोल तपास होईपर्यंत परीक्षा प्रक्रिया सुरू ठेवणे योग्य ठरणार नाही. तपासादरम्यान प्रश्नपत्रिका नेमकी कुठून लीक झाली, किती केंद्रांवर गैरप्रकार झाले, कोणत्या टोळ्या सक्रिय होत्या आणि यामागे कोणते मोठे रॅकेट कार्यरत होते, याचा शोध घेतला जाणार आहे. या प्रकरणात काही मोठी नावे समोर येण्याची शक्यता तपास यंत्रणांकडून व्यक्त केली जात आहे.दरम्यान, राष्ट्रीय परीक्षा संस्था (एनटीए) नेही या प्रकरणात सीबीआयला पूर्ण सहकार्य करण्याची भूमिका घेतली आहे. राजस्थान पोलिसांच्या विशेष कृती गटाने (एसओजी) केलेल्या तपासात धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. नीट परीक्षेच्या तब्बल १२ ते १५ महिने आधीपासून अंदाजित प्रश्नपत्रिका नावाने १५० पानी साहित्य विद्यार्थ्यांमध्ये फिरत असल्याचे समोर आले आहे. या दस्तऐवजात सुमारे ४१० प्रश्न होते. त्यापैकी तब्बल १२० प्रश्न रसायनशास्त्र विभागातील मूळ प्रश्नांशी मिळतेजुळते असल्याचे सांगितले जात आहे.नीट परीक्षा रद्द झाल्याने सुमारे १० लाख विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षा द्यावी लागणार आहे. अनेक पान ४ वर

## नांदेडसह राज्यात ३ दिवस उष्मालाट

### नांदेडसाठी यलो अलर्ट जारी

नांदेड-प्रादेशिक हवामान विभागाने नांदेड जिल्ह्याला १४ व १५ मे या दोन दिवसांसाठी यलो अलर्ट जारी केला आहे. जिल्ह्यात या दोन दिवसात उष्मालाट असण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात जिल्हा प्रशासनाने संबंधीत यंत्रणा व जनतेने खबरदारी घेवून उपाययोजना कराव्यात असे आवाहन केले आहे.

पुणे:मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात पुढील ३ दिवस उच्चांकी तापमान असेल तर राज्यात अजुन काही दिवस उष्माघाताचा धोका असल्याची माहिती हवामान विभागाचे शास्त्रज्ञ सखाराम सानप यांनी ही माहिती दिली.

राज्यातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये तापमानाचा पारा ४० अंशांच्या पुढे गेला असून अकोला आणि नंदुरबार येथे तापमानाने ४५.३ अंशांचा टप्पा ओलांडला आहे. त्यामुळे नागरिकांना तीव्र उकाड्याचा सामना करावा लागत आहे. पुढील तीन ते चार दिवस तापमानात आणखी वाढ होण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.भारतीय हवामान विभागाने राज्यातील बहुतांश जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी केला असून विशेषतः उत्तर-मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील काही भागांमध्ये उष्णतेची तीव्रता अधिक जाणवणार आहे. पुढील पाच दिवस पावसाची शक्यता नसल्याने तापमान कमी होण्याची चिन्हेही दिसत नसल्याचे हवामान खात्याने स्पष्ट केले आहे. मागील काही दिवसांमध्ये राज्यात अवकाळी पावसाने हजेरी लावल्यामुळे उष्णतेपासून काहीसा दिलासा मिळाला होता. मात्र आता पुन्हा एकदा उन्हाचा तडाखा वाढू लागला असून दुपारच्या वेळेत रस्त्यांवर शुकशुकाट दिसून येत आहे. वाढत्या तापमानामुळे पान ४ वर

## बंगाल नंतर आता नांदेडात एटीएम व बँका कंगाल?

नांदेड/प्रतिनिधी-देशातील पश्चिम बंगालसह पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल नुकतेच जाहीर झाले आहेत. त्यानंतर आता नांदेड शहर आणि जिल्ह्यातील अनेक एटीएममध्ये ५०० आणि २०० रुपयांच्या नोटा दिसेनाशा झाल्याची चर्चा सुरू झाली आहे. बहुतांश एटीएममध्ये फक्त १०० रुपयांच्या नोटाच उपलब्ध होत असल्याने नागरिकांमध्ये संभ्रम आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.



गेल्या काही दिवसांपासून नागरिक एटीएममधून पैसे काढण्यासाठी जात आहेत. मात्र, मशीनमधून मोठ्या मूल्याच्या नोटा न मिळता केवळ शंभर रुपयांच्या नोटांचा पाऊस पडत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. त्यामुळे 'बंगाल नंतर बँका कँगाल?' असा सवाल आता सामान्य नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. काही नागरिकांनी यामागे आर्थिक व्यवस्थेतील बदल, निवडणुकांनंतरचा निधी प्रवाह किंवा बँकिंग व्यवस्थेतील तांत्रिक कारणे असू शकतात, असा अंदाज व्यक्त केला आहे. मात्र, याबाबत कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. त्यामुळे लोकांमध्ये विविध चर्चांना उधाण आले आहे.दरम्यान, ''नोटांचा झोल आणि पंतप्रधानांचा मुड अर्थात 'झोलमुड' आहे की काय'' असा उपरोधिक सवाल सोशल मीडियावरूनही विचारला जात आहे. केंद्र सरकार किंवा रिझर्व्ह बँकेकडून यासंदर्भात स्पष्ट भूमिका येण्याची अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत. नागरिकांच्या दैनंदिन व्यवहारांवर याचा परिणाम होत असून व्यापाऱ्यांनाही सुट्ट्या पैशांच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. प्रशासनाने आणि बँकांनी याकडे गांभीर्याने लक्ष देऊन परिस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## परवानगीशिवाय मंत्र्यांना विमान नाही

### ऑनलाइन बैठका व इलेक्ट्रिक वाहनांवर भर

मुंबई/प्रतिनिधी-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही मंत्र्याला सरकारी कामासाठी विमानाचा वापर करता येणार नाही,अशा स्पष्ट सूचना राज्य सरकारकडून देण्यात आल्या आहेत.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या काटकसरीच्या आवाहनानंतर राज्यात या निर्णयाची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे.ही माहिती मंत्री तथा भाजपचे ज्येष्ठ नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काटकसरीच्या आवाहनानंतर राज्यातील मंत्र्यांच्या विमान प्रवासावर आता निर्बंध आणण्यात आले असून तातडीचे काम असेल तेव्हाच मी विमानाचा वापर करतो. वर्षभरात चार-पाच वेळाच अशी गरज भासते. असे सांगत राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अत्यंत व्यस्त असल्यामुळे ते विमान वापरतात. मात्र आता मुख्यमंत्र्यांच्या मंजुरीशिवाय कोणत्याही मंत्र्याला विमान वापरता येणार नाही, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.ते पुढे म्हणाले की, माझ्या बहुतांश बैठका ऑनलाइन पद्धतीने होतात. जिल्हाधिकारी किंवा अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष बोलावण्याऐवजी ऑनलाइन संवादातून प्रश्न सोडवण्यावर भर दिला जात आहे.दरम्यान, मुख्यमंत्री फडणवीस यांच्या सूचनेनुसार मत्स्य विकास व बंदर विभागाचे मंत्री नितेश राणे यांनीही विभागीय कामकाजात काटकसरीचे धोरण राबवण्यास सुरुवात केली आहे. विभागातील सर्व बैठका आता ऑनलाइन पद्धतीने घेण्याचे निर्देश देण्यात आले असून पेट्रोल-डिझेल वाहनांऐवजी इलेक्ट्रिक वाहनांच्या वापरावर भर देण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना करण्यात आल्या आहेत.सरकारच्या या निर्णयामागे देशाच्या आर्थिक परिस्थितीचाही मोठा संबंध असल्याचे मानले जात आहे. जागतिक स्तरावर वाढलेल्या इंधन, सोने, खत आणि गॅसच्या किमतींमुळे भारताच्या परकीय चलन साठ्यावर ताण निर्माण होत आहे. भारताला आयातीसाठी मोठ्या प्रमाणात डॉलर खर्च करावे लागत असल्याने डॉलर साठा जपण्याचे आव्हान सरकारसमोर उभे ठाकले आहे.

## रुपाली चाकणकरांना ईडीचे समन्स

मुंबई/प्रतिनिधी-राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्याभोवती भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणातील चौकशीचा फास अधिक घट्ट होताना दिसत आहे.



विशेष तपास पथकाकडून तब्बल सहा तास चौकशी झाल्यानंतर आता अंमलबजावणी संचालनालयाने रुपाली चाकणकर यांना समन्स बजावले असून याच आठवड्यात चौकशीसाठी हजर राहण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.भोंदू अशोक खरात प्रकरणातील आर्थिक व्यवहार, संशयित पैशांची देवाणघेवाण आणि मनी लॉन्ड्रिंगच्या अनुषंगाने ईडीकडून ही चौकशी सुरू करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. यापूर्वीही ईडीने या प्रकरणात रुपाली चाकणकर यांच्या बहिणीची चौकशी केली होती. आता स्वतः चाकणकर यांना समन्स बजावण्यात आल्याने तपासाची व्याप्ती वाढल्याचे स्पष्ट होत आहे.

## शहर वाहतूक शाखेकडून ५ लाखांचा दंड वसूल

नांदेड/प्रतिनिधी-शहर वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस निरिक्षक भागवत नागरगोजे यांच्या नेतृत्वाखाली वाहतूक शाखेच्या पोलीसांनी सोमवार दि.११ मे रोजी नांदेड शहरात राबविलेल्या विशेष मोहीमेत ४८२ कारवाई करण्यात आली असून ५ लाख ८ हजार रुपयांचा दंड वसुल करण्यात आला.

पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवारी सपोनी भागवत नागरगोजे व पोलीस कर्मचाऱ्यांनी विशेष मोहिम राबविण्यात आली. या मोहिमे अंतर्गत रेल्वे स्टेशन रोड, महावीर चौक, कलामंदिर, वर्कशॉप, राज कॉर्नर व छत्रपती चौक या ठिकाणी शहर वाहतूक शाखेच्या पोलीसांनी वाहनांची कागदपत्रे तपासली गेली. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर, ट्रिपलसीट वाहने, परवाना नसलेले वाहने तसेच रस्त्यावर लावण्यात आलेले अनधिकृत फळांचे हातगाडे व इतर वाहनांवर पोलीसांनी ४८२ दंडात्मक कारवाई केली. त्यांच्याकडून ५ लाख ८ हजार रुपये दंड वसुल करण्यात आला.




## पंतप्रधान मोदींच्या आवाहनांवर सर्वपक्षीय बैठक घ्या-खा.शरद पवार

मुंबई/प्रतिनिधी-मध्यपूर्वेतील युद्धजन्य आणि अस्थिर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनांनंतर देशभरात संभ्रमाचे वातावरण तयार झाले असल्याने केंद्र सरकारने सर्वपक्षीय बैठक घेवून या प्रश्नावर उपाययोजना कराव्यात अशी मागणी ज्येष्ठ नेते खा.शरद पवार यांनी समाज माध्यमांवरील पोस्ट द्वारे केंद्र सरकारकडे केली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (१० मे) देशवासियांना संबोधित करत सोने खरेदी टाळा, परदेश प्रवास कमी करा, पेट्रोल-डिझेलचा वापर मर्यादित ठेवा आदी आवाहन केले होते. या विधानांमुळे देशात लॉकडाऊन सदृश परिस्थिती निर्माण होणार का, अशी चर्चा जनतेत सुरू झाली आहे. मध्यपूर्वेतील अस्थिर आणि युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर देशाच्या अर्थव्यवस्थेवर दूरगामी परिणाम होऊ शकतो. ही बाब निश्चितच काळजी वाढवणारी पान ४ वर

## 'त्या'दोन चिमुकल्या बहिणींचा मृत्यू सर्पदंशामुळे नव्हे तर विषबाधेमुळे झाला

### रुग्णालयाचे अधिक्षक डॉ.दत्ता केंद्रे यांची माहिती

किनवट/प्रतिनिधी-गोकुळनगर (चिखली) येथील त्या दोन सख्ख्या चिमुकल्या बहिणींचा मृत्यू हा विषबाध्यामुळे झाला असून सर्पदंशामुळे झालेला नसल्याची स्पष्टोक्ती प्रशासनाने केलीय. आंदबोरी येथील शेतकऱ्यांला सर्पदंश झाला मात्र रुग्णालयात वेळीच पोहोचले असते तर शेतकऱ्याचा मृत्यू झाला नसता.

पार्डी येथील युवा शेतकऱ्याला चावा घेतला तो सापाने की उंदराने? याबद्दलची संभ्रमावस्था निर्माण झाल्यामुळे उपचाराला विलंब झाल्याने दुर्दैवी घटना घडली. सर्पदंशाच्या उपचारासाठी लागणारा औषधीसाठा उपलब्ध असून दुर्दैवाने सर्पदंश झालाच तर वेळ न गमावता वेळीच उपजिल्हा रुग्णालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन वैद्यकीय अधीक्षक डॉ.दत्ता केंद्रे यांनी केले आहे.

गोकुळनगर (चिखली) येथील निरागस दोन चिमुकल्या बहिणींचा मृत्यू हा वेदनादायी आहे. सर्पदंशामुळेच मृत्यू झाल्याचा दावा गोकुंद्धा उपजिल्हा रुग्णालय प्रशासनाने चक्क फेटाळत दोन्ही बालिकांचा मृत्यू विषबाधेमुळे झाल्याचे स्पष्ट केले आहे. सई दिलीप मुंगल (वय ४) व बहिण श्रुष्टी दिलीप मुंगल यांना उपचारासाठी गोकुंदा येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. दोघींची प्रकृती गंभीर झाल्याने पुढील उपचारासाठी आदिलाबाद येथे हलविण्यात आले. सईचा ८ मे रोजी उपचारा दरम्यान मृत्यू झालाय. आणि सईची मोठी बहीण श्रुष्टी दिलीप मुंगल (वय ६) हिचा ९ मे रोजी रात्री आदिलाबाद येथील रुग्णालयात उपचारा दरम्यान मृत्यू झाला. या घटनेमुळे मुंगल कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून सर्वत्र शोककळा पसरली होती. दरम्यान, या घटनेबाबत गोकुंद्धा उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.दत्ता केंद्रे यांनी स्पष्ट केले की, संबंधित दोन बालिकांना सर्पदंश झालेला नव्हता. दूषित अन्न सेवन केल्यामुळे त्यांना विषबाधा होऊन त्यांचा मृत्यू झाला. त्याच दिवशी अंदबोरी येथील एका शेतकऱ्याला सर्पदंश



झाल्याची घटना घडली. दंशानंतर संबंधित शेतकऱ्यांवर गावातच खाजगी उपचार करण्यात आले. जवळपास एक तासानंतर त्यांना उपजिल्हा रुग्णालयात उपचारांसाठी आणले मात्र, उपचार सुरू असतानांच त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती डॉ.केंद्रे यांनी दिली. सर्पदंश झाल्यास कोणत्याही प्रकारचे खाजगी उपचार न करता आणि त्यात वेळ न गमावता तातडीने शासकीय पान ४ वर

### सर्पदंशामुळेच मुलींचा मृत्यू

सई आणि श्रृष्टी या चिमुकल्या मुलींचा मृत्यू हा सर्पदंशामुळेच झाला असल्याचे दिलीप मुंगल यांनी स्पष्ट केले आहे. या चिमुकल्या मुली शेतात फुलं तोडीत असताना सापाने या बाळांना चावा घेतला होता.उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले होते. प्राथमिक उपचारानंतर आदिलाबाद येथे पुढील उपचारासाठी पाठविण्यात आले होते. तेथे उपचारादरम्यान चिमुकल्या मुलींचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे. या चिमुकल्या गेल्यामुळे मुंगल परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेनंतर पालक आणि वैद्यकीय यंत्रणेची बाजू मांडली आहे. शवविच्छेदन अहवालाकडे आता लक्ष लागून आहे. निष्पाप दोन चिमुकल्यांच्या मृत्यू झाला ही मन हेलावून टाकणारी घटना आहे.

# सल्ला श्रीमंतांना, फटका गरिबांना

**देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हैदराबाद आणि गुजरातमधील सभांमध्ये देशवासीयांना काही आर्थिक काटकसरीच्या सूचना केल्या. जागतिक युद्धजन्य परिस्थिती, वाढती महागाई, इंधन संकट आणि आर्थिक अस्थिरता यांचा विचार करता त्यांनी सोन्याचा वापर कमी करणे, इंधन बचत करणे, परदेशी पर्यटन आणि खर्चिक कार्यक्रम टाळणे यासारखे आवाहन केले. देशहिताच्या दृष्टीने पाहिले तर या सूचना योग्य आणि आवश्यक वाटतात. मात्र या सूचनांचा परिणाम कोणावर होणार आणि त्याचा फटका कोणाला बसणार?, हा खरा प्रश्न आहे.मोदी यांनी केलेल्या बहुतांश सूचना या प्रत्यक्षात श्रीमंत वर्गाला उद्देशून आहेत. परदेशात लग्न करणे, विदेशी पर्यटन करणे, मोठ्या प्रमाणावर सोन्याची खरेदी करणे किंवा आलिशान वाहनांचा वापर करणे हे सर्वसामान्य गरीब किँवा मध्यमवर्गीयांच्या आवाक्याबाहेरचे आहे. गरीब माणूस आजही रेल्वे, बस किंवा सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर अवलंबून आहे. वाढत्या महागाईमुळे मध्यमवर्गीयांचे घर चालवणे कठीण झाले आहे. त्यामुळे ''कमी खर्च करा'' हा सल्ला त्यांच्यासाठी नवीन नाही; ते आधीपासूनच काटकसर करून जीवन जगत आहेत. परंतु या आवाहनांचा प्रत्यक्ष परिणाम मात्र गरीब आणि असंघटित क्षेत्रातील कामगारांवर होण्याची भीती आहे. उदाहरणार्थ, सोन्याच्या वापरावर मर्यादा आणण्याचे आवाहन करण्यात आले. भारतात सोने हे केवळ गुंतवणूक किँवा श्रीमंतीचे प्रतीक नाही, तर सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरेचा भाग आहे. लग्न समारंभ, सण-उत्सव किंवा धार्मिक कार्यक्रमांमध्ये सोन्याचे दागिने महत्त्वाचे मानले जातात. या दागिन्यांमागे हजारो कारागिरांचे श्रम दडलेले आहेत.पश्चिम बंगाल, बिहार, गुजरातसारख्या राज्यांमधून आलेले हजारो कारागीर देशभरात सोनार काम करून आपला उदरनिर्वाह करतात. दागिने बनवणे हे अत्यंत कौशल्यपूर्ण आणि किचकट काम आहे. या कारागिरांना आधीच पुरेसा मोबदला मिळत नाही. अशा वेळी जर सोन्याची मागणी कमी झाली, तर सर्वप्रथम बेरोजगारीचा फटका या गरीब कामगारांना बसेल. श्रीमंत व्यक्ती सोनं खरेदी टाळून दुसऱ्या गुंतवणुकीकडे वळू शकते, पण कारागिराकडे पर्याय नसतो. पेट्रोल आणि डिझेलचा वापर कमी करण्याचे आवाहन देखील देशहितासाठी योग्यच आहे. आयात होणाऱ्या इंधनावर भारताचा मोठा खर्च होतो. मात्र या क्षेत्राशी जोडलेले लाखो छोटे कामगार, ट्रान्सपोर्ट व्यवसाय, पेट्रोल पंपांवरील कर्मचारी, वाहन दुरुस्ती करणारे मेकॅनिक यांच्या रोजगारावर त्याचा परिणाम होऊ शकतो. इंधनाचा वापर कमी झाला की, व्यवहार कमी होतात आणि त्याचा थेट परिणाम तळागाळातील लोकांच्या उत्पन्नावर होतो. पर्यटन क्षेत्राबाबतही अशीच परिस्थिती आहे. पर्यटन हे अनेक राज्यांच्या अर्थव्यवस्थेचे मोठे साधन आहे. पर्यटनस्थळी छोटे विक्रेते, हातगाडीवाले, चहावाले, हॉटेल कर्मचारी, मार्गदर्शक, फोटोग्राफर असे असंख्य लोक पर्यटकांवर अवलंबून असतात. जर लोकांनी खर्च कमी करण्यासाठी पर्यटन टाळले, तर सर्वाधिक नुकसान या छोट्या व्यावसायिकांचे होईल. श्रीमंत व्यक्ती एखादे पर्यटन रद्द करेल, पण गरीबाचा रोजचा रोजगार हिरावला जाईल. मोदी यांनी या सूचनांचा दोन दिवसांत वारंवार उल्लेख केला, यावरून जागतिक आर्थिक परिस्थितीची गंभीरता स्पष्ट होते. मात्र कोणतीही आर्थिक शिस्त किंवा काटकसर राबवताना तिचा सामाजिक परिणाम लक्षात घेणे तितकेच आवश्यक असते. देशहितासाठी जनतेने सहकार्य करणे गरजेचे आहे, पण त्या बदल्यात गरीब आणि श्रमिक वर्गासाठी संरक्षणात्मक उपाययोजना देखील सरकारने करायला हव्यात.कारण शेवटी कोणतीही आर्थिक मंदी किंवा संकट हे श्रीमंतांना थोडे अस्वस्थ करते, पण गरीबांच्या चुली विझवते. त्यामुळे ''कमी खर्च करा'' या संदेशासोबत ''गरीबांचे रोजगार कसे टिकतील'' याचाही गंभीर विचार होणे आवश्यक आहे.**

# आई-वडीलच घडवू शकतात आपल्या मुलांचं भविष्य ?




आई-वडीलच घडवू शकतात आपल्या मुलांचं भविष्य. असं म्हटल्यास आतिशयोक्ती वाटणार नाही. कारण ते जसे वागतात. त्याचं अनुकरण त्यांची मुलं करीत असतात. जर ते दारु पित असतील तर मुलंही दारु पित असतात आणि ते जर व्याभिचार करीत असतील तर...मुलंही व्याभिचारी निघतात. म्हणूनच खुद्द आईवडीलांनी चांगले वागण्याची गरज आहे. जेणेकरुन मुलांमध्येही चांगले संस्कार रुजतील व मुलांचं भविष्य उज्ज्वल बनेल.

'झोपले का बाळांनो, उठा लवकर. आज शाळेत जायचंय.' एका अशिक्षित आईचे उद्गार. ती अशिक्षित होती. परंतु तिला आपल्या बाळाची काळजी होती. तिला वाटत होतं की ते बाळ. ते आपलं आहे व शिकायला हवं. तो शिकून मोठा व्हायला हवा. त्याला आपल्यासारखं उन्हात राबावं लागू नये. ती आई अशिक्षित असली तरी तिला शिक्षणाचं महत्व कळलं होतं. आज त्याच आईनं आपल्या बाळाच्या मागं लागून लागून त्यांना उच्च शिक्षण शिकवलं होतं. तिला नोकरी लागतांना वशिला हवा वा ओळखपारख हवी हेही माहीत नव्हतं. आज तिची मुलं उच्चशिक्षित झाली होती व चांगल्या हुद्यावर नोकरीलाही लागली होती. आई-वडील सर्वांचेच आई-वडील शिकवतात आपल्या बाळाला. आपल्या बाळाचं भविष्य घडविण्यासाठी प्रयत्न करतात. त्यांना उन्हातून सावलीत नेतात. त्यांच्या पुस्तकांची इच्छा पुरवतात. वाटतं की ते मुल उच्चशिक्षण शिकावं. परंतु सर्वच आई-वडीलांची मुलं उच्चशिक्षित होतात का? याचं उत्तर नाही असंच येतं. काहींची मुलं उच्चशिक्षित होतात आणि काहींची. अजिबात शिकत नाहीत. त्याचं कारण काय? मुलांचं उच्चशिक्षित होणं न होणं. यासाठी अनेक कारणं जबाबदार असतात. त्यातील मुख्य एक कारण असतात, त्या मुलांचेच आई-वडील. मुलांच्या आई-वडीलांच्या सवयी जर वाईट असतील, तर ती मुलं देखील वाईट मार्गाकडं नकळत जातच असतात. उदाहरण द्यायचं झाल्यास आजच्या काळातील मोबाईलचं देता येईल. आजचे आई-वडील मुलांकडून अपेक्षा करतात की त्यांनी जास्त मोबाईल पाहू नये आणि स्वतःच मुलांसमक्ष मोबाईल पाहात बसतात. तेच पाहातं मुल व तेही मोबाईल पाहायला बसतं आणि मोबाईल हिसकल्यास जोरजोरानं रडतं. मग ते मुल रडू नये म्हणून खुद्द आईवडील त्याला मोबाईल देतात व ते चूप बसतं.

मोबाईल पाहण्याची ही आई-वडीलांची सवय. तीच सवय बाळांना लागते. आज अगदी लहान बाळ, मग ते एक वर्षाचं का असेना, ते आपल्याला त्रास देतं म्हणून वा त्यानं आपल्याला त्रास देवू नये म्हणून खौद्द आई-वडीलच त्याच्या हातात मोबाईल देतात. तो चूप, मग आपलंही काम सुकर. अशी अपेक्षा. परंतु त्यातून आपलं मूल बिघडतं. याचा विचार कोणीच करीत नाही. ही झाली मोबाईलपुराणाची गोष्ट. दुसरी महत्वपुर्ण गोष्ट आहे, आई-वडीलांच्या सवयी. त्या सवयीही वाईटच असतात आणि त्याच सवयी बाळांना अगदी ते एकदोन वर्षाचे असतात. तेव्हापासूनच लागत असतात.

मुख्यतः श्रीमंत असो की गरीब असो. आई-वडीलांना खर्रा खाण्याची सवय असते. अशावेळेस ते आई-वडील स्वतः दुकानात न जाता आपल्या मुलांना पाठवतात. ज्यातून खर्रा खाण्याची सवय मुलांमध्ये लागू शकते. काही घरी वडील हे आपल्याच मुलांसमोर दारु पितात. अशावेळेस मुलांना दारुची सवय लागू शकते. काही स्त्रिया आपली मुलं लहान असतांनाच आपल्या पतीला कामावर जावू देतात व परपुरुषांसोबत व्यभिचार करतात. अशावेळेस मुलांमध्ये व्याभिचाराची सवय लागू शकते. अशी मुलं लहानपणापासूनच त्यांचे आई-वडील करीत असलेल्या काही वेगवेगळ्या अनैतिक गोष्टी पाहात असतात. ज्यातून वाईट सवयीचं बीजारोपण होतं. मग मुलं वाईट मार्गावर लागली आणि त्यांनी वाईट कृत्य केलं तर आपल्याला त्याचा पश्चाताप होतो. ही सत्य बाब आहे. परंतु पश्चाताप होण्यापुर्वी जर मुलांची घडणी चांगल्या स्वरुपाची व्हावी असं जर वाटत असेल पालकांना तर त्यांनी त्यांना आपल्या कोणत्याही वाईट सवयी न दाखवता जर चांगल्या गोष्टी सांगीतल्या तर मुलांमध्ये चांगल्या गोष्टी टाकता येतील. चांगल्या मुल्य वा संस्कारांचे त्यांच्यात बीजारोपण करता तरी येवू शकेल. यात आणखी एक उदाहरण. एक व्यक्ती दारु प्राशन करायचा. त्याला रोज सायंकाळी दारु प्यायल्याशिवाय झोपच येत नव्हती. परंतु एक दिवस त्यानं आपल्या तरुण व नुकत्याच वयात आलेल्या मुलाला पाहिलं. त्याला कळलं की दारु वाईट. आपण जशी पितो. तसा मुलगाही प्यायला लागला. ज्यातून मुलाचं भविष्य खराब होणारच. त्यानंतर त्यांना परमात्मा एक. ज्यात दारु अजिबात चालत नाही. हा धर्म घेतला. ज्यातून स्वतः दारु सोडली. ते पाहून मुलालाही नाईलाजास्तव दारु सोडावी लागली. कारण धर्माचं वलय देवून व त्याला संकटाची जोड देवून दारु पिवून घरी आल्यास संकट उद्धवतं. अशी आख्यायिका त्या धर्मात असल्यानं दारुला अजिबात तो मुलगा स्पर्श करीत नव्हता. अशानं त्या मुलात संस्कार वाढीस लागले. दुसरं उदाहरण बाबासाहेबांचं. त्यांचे वडील रामजी सपकाळ कसेही असोत. त्यांनी आपल्या मुलाला घडवीत असतांना चांगली वागणूक ठेवली. ज्यातून डॉ. बाबासाहेब घडले. महत्वाचं सांगायचं झाल्यास आई-वडील हेच आपल्या बाळांमध्ये जास्त प्रमाणात संस्कार रुजवू शकतात. जर त्यांनी चांगलं वर्तन घरी ठेवलं तर...कारण आपल्याच वागण्यातून मुलं घडत असतात. आपण कसे वागतो? काय खातो? खाय पितो? हे पाहात असतात मुलं. ते पाहून एखाद्या दिवशी त्याचप्रमाणे करौ पाहतात. ज्यातून संस्कार बिघडतोच. याचाच अर्थ असा की आई-वडीलांच्याच विकृत वागण्यातून मुलं बिघडतात. ते जर सुसंस्कारी असतील तर मुलंही सुसंस्कारी निघतात. त्यासाठी आईवडीलांनी खुद्द स्वतःला चांगल्या सवयी लावाव्यात. जेणेकरुन त्यांचंच अनूकरण करौन मुलंही चांगली संस्कारी निघतील. जे संस्कार त्यांच्या पश्चात मुलांच्याच कामात येतील. जसे थॉमस अल्वा एडीसन. त्यांच्या आईनं त्याला शास्त्रज्ञ बनवून दाखवलं. ज्याचं इवलसंही कसब थॉमसच्या आईमध्ये नव्हतं. दुसरं उदाहरण शिवाजी महाराजांचं देता येईल की ज्यांच्या आईनं बाल शिवबाला शिकवलं. ज्यातून स्वराज्याची नीव बांधली गेली. अशी बरीच उदाहरणं आहेत की ज्यांच्या आईवडिलांनी त्यांच्या मुलांना घडवलं आहे. मुखत्वे सांगायचं म्हणजे संस्कार हे मुल्य काही बाजारात मिळत नाहीत. ते घरातच मिळतात, आपल्या आई-वडीलांच्या वागण्यातून. आईवडील हेच आपल्या बाळात संस्कार टाकू शकतात. परंतु ते टाकण्यासाठी खुद्द आई-वडीलांना आपल्या वाईट सवयीवर बंधन घालावं लागतं. अशी बंधनं जे आईवडील घालू शकतात. त्यांचीच मुलं चांगली सुसंस्कारी बनू शकतात. इतरांची नाही. म्हणूनच खुद्द आई-वडीलांनीच संस्कारी राहावे. दारुची सवय असेल तर दारु सोडून द्यावी किँवा मुलांसमोर पिवू नये. व्याभिचाराचक सवय असेल तर तिही गोष्ट सोडून द्यावी. कारण तशा वाईट सवयी या आनुवांशिकतेच्या तत्त्वानुसार गुणसुत्राच्या रुपाने तरी आपल्या येणाऱ्या पिढीत उतरत असतात. म्हणूनच आई-वडीलांनी सावधानता बाळगावी. निदान संस्कारासाठी. जर आपली येणारी पिढी चांगली निपजावी, असं वाटत असेल तर...

विशेष म्हणजे आई-वडीलच घडवू शकतात आपल्या मुलांचं भविष्य. असं म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही. कारण ते जसे वागतात. त्याचं अनुकरण त्यांची मुलं करीत असतात. जर ते दारु पित असतील तर मुलंही दारु पित असतात आणि ते व्याभिचार करीत असतील तर...मुलंही व्याभिचारी निघतात. म्हणूनच खुद्द आई-वडीलांनी चांगले वागण्याची गरज आहे. जेणेकरुन मुलांमध्येही चांगले संस्कार रुजतील व मुलांचं भविष्य उज्ज्वल बनेल. हे तेवढंच खरं.

**अंकुश शिंगाडे**
नागपूर.

# जीव आहे आपला, सुरक्षित जपा; किनवटमध्ये आरटीओची रस्ता सुरक्षा मोहीम




किनवट/प्रतिनिधी- जीव आहे आपला त्याला सुरक्षित जपा, होऊ नये हानी म्हणून हेल्मेट वापरा, असा सुरक्षा संदेश देत किनवटमध्ये रस्ता सुरक्षा अभियान २०२६ चा जागर करण्यात आला. प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय नांदेड आणि आरटीओंच्या संयुक्त शिबिर यांच्या वतीने ११ मे रोजी पार पडलेल्या मोहिमेत कार आणि मोटारसायकल रॅली काढून रस्ते सुरक्षेचे महत्त्व पटवून देण्यात आले.

सध्याच्या धावपळीच्या युगात रस्ते अपघातांचे प्रमाण वाढत आहे. हे अपघात रोखण्यासाठी आणि नागरिकांमध्ये नियमाप्रती जागरूकता निर्माण करण्यासाठी आरटीओ विभागाने कँबर कसली आहे. या अभियानांतर्गत आयोजित रॅलीमध्ये सीट बेल्ट वापरा, जीव वाचवा अशा घोषणांनी आवाहन करण्यात आले. मुख्य कार्यक्रमात नांदेड आरटीओ कार्यालयाचे मोटार वाहन निरीक्षक दिनेश पाटील, निलेश पवार, अजिंक्य गायकवाड, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक अक्षय काळे, वाहन चालक अमोल नाईकवाडे व नागेश पांढरे यांनी सक्रिय सहभाग घेऊन नागरिकांना मार्गदर्शन केले. केवळ नियम सांगून न थांबता, आरटीओच्या अधिकाऱ्यांनी स्वतः रॅलीत सहभागी होऊन वाहनधारकांशी संवाद साधला. दुचाकी चालवताना आयएसआय मार्क हेल्मेट घालणे आणि चारचाकी चालवताना सीटबेल्ट लावणे किती अनिवार्य आहे, याचे प्रात्यक्षिकच या माध्यमातून देण्यात आले. या रॅलीत किनवट मधील नागरिकही मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# जलसंधारण कामांना वेग ३७९ पैकी १७७ कामे पूर्ण



नांदेड/प्रतिनिधी-एल निनोच्या संभाव्य परिणामांच्या पार्श्वभूमीवर नांदेड जिल्ह्यात जलसंधारणाच्या कामांना मोठ्या प्रमाणात गती देण्यात आली आहे. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली मृद व जलसंधारण विभागामार्फत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात नाला खोलीकरण व रुंदीकरणाच्या एकूण ३७९ कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी १७७ कामे पूर्ण झाली असून २०२ कामे सध्या प्रगतीपथावर आहेत. आतापर्यंत १ लाख ७८ हजार ६६८ मीटर खोलीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

उर्वरित कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याचे नियोजन प्रशासनाने केले असून आणखी ८६ हजार ५८३ मीटर खोलीकरणाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या कामांमुळे पावसाळ्यात शेतांमध्ये पाणी साचून होणारे नुकसान कमी होणार असून भूजल पातळीत वाढ होण्यास मदत मिळणार आहे. परिणामी पाणीटंचाई निवारण, सिंचन सुविधा आणि शेती उत्पादन वाढीस चालना मिळणार आहे.याशिवाय, जलसंधारण कामांच्या परिसरात एक लाख बांबू लागवडीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. बांबू लागवडीमुळे जमिनीची धूप रोखण्यास मदत होणार असून पर्यावरण संवर्धनालाही हातभार लागणार आहे. कमी खर्चात अधिक उत्पादन मिळत असल्याने शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठीही हा उपक्रम उपयुक्त ठरणार आहे.दरम्यान, गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार अभियानांतर्गत सन २०२५-२६ मध्ये आतापर्यंत ५४ तलावांमधून गाळ काढण्यात आला आहे. ५८४ शेतकऱ्यांनी ९ लाख ६३ हजार २४३ घनमीटर गाळ शेतात टाकला आहे. त्यामुळे संबंधित भागातील पीकपद्धतीत बदल होऊन गहू, हळद आणि कापूस यांसारख्या नगदी पिकांकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन रोजगारासाठी होणारे स्थलांतरही कमी होण्यास मदत होत आहे.सन २०२६-२७ साठी या अभियानांतर्गत २८ कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून अंदाजे ८ लाख ५८ हजार १३५ घनमीटर गाळ काढण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. या उपक्रमाचा लाभ ४८८ शेतकऱ्यांना होणार असल्याची माहिती जलसंधारण विभागाने दिली.

# ग्रामीण भागातही पार पडू लागले शाही विवाह सोहळे

भोकर/प्रतिनिधी-पूर्वी शहरी भागामध्येच मंगल कार्यालयामध्ये शाही विवाह सोहळे पार पडत असत मात्र सद्यस्थितीत ग्रामीण भागातही शाही विवाह सोहळे थाटामाटात पार पडताना दिसून येत आहेत. भोकर तालुक्यातील सायाळ येथील युवा कार्यकर्ते सुरेश पाटील डुरे हे सधन शेतकरी असून त्यांनी आपल्या मुलीचा शुभश्री हिचा विवाह सोहळा अगदी थाटामाटात शाही पद्धतीने पार पाडला. हदगाव येथील किशोर पाटील वानखेडे यांचे चिरंजीव केतन यांच्याशी हा विवाह सोहळा संपन्न झाला. भव्य असा मंडप, स्टेजचे डेकोरेशन, वाद्यवृंद व्यवस्था वराची घोड्यावरून मिरवणूक, मान्यवरांचे जंगी स्वागत, त्यापूर्वी झालेला हळदीचा सोहळा मान्यवर पाहुण्यांची उपस्थिती, सुरूची भोजनाची व्यवस्था अशा पद्धतीचा विवाह शेतकरी कुटुंबामध्ये असून सुद्धा धुळे परिवाराने पार पडला. या सोहळ्यासाठी गावकरी मंडळींनी मोलाचे परिश्रम घेतले. सोहळ्यासाठी माजी आ. सौ.अमिता चव्हाण, नांदेडच्या महापौर कविता मुळे यांच्यासह तालुक्यातील मान्यवर मंडळी उपस्थित होती ग्रामीण भागात एवढा मोठा विवाह सोहळा पार पडला.

सायंदैनिक **नांदेड वार्ता**
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर, भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# पंतप्रधानांचे इंधन बचतीचे आवाहन अन् माहूरमध्ये सरकारी कर्मचाऱ्यांचा अप-डाऊन कारभार!

माहूर/प्रतिनिधी-एकीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी देशवासीयांना पेट्रोल, डिझेल आणि गॅसचा वापर जपून करण्याचे आवाहन करीत आहेत. पश्चिम आशियातील तणाव आणि जागतिक आर्थिक संकटाच्या पार्श्वभूमीवर इंधन बचत ही काळाची गरज असल्याचे सांगितले जात असताना दुसरीकडे माहूर तालुक्यातील वास्तव मात्र संतापजनक आहे. येथे अनेक शासकीय कर्मचारी आणि अधिकारी जिल्ह्याच्या ठिकाणावरून, तर काही थेट मोठ्या शहरांमधून रोजचा अप-डाऊन करून सरकारी कारभार चालवत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

डोंगरदऱ्या आणि जंगलांनी वेढलेल्या माहूर तालुक्यात अनेक गावे आजही दुर्गम भागात आहेत. शासनाने गावागावांत शिक्षक, तलाठी, ग्रामसेवक, आरोग्य कर्मचारी, कृषी सहाय्यक,महावितरण कर्मचारी यांची नियुक्ती केली खरी; मात्र प्रत्यक्षात हे कर्मचारी मुख्यालयी राहतच नसल्याने नागरिकांना मूलभूत सेवांसाठी हेलपाटे मारावे लागत आहेत. ग्रामीण भागातील आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्रे शासनाने उभारली, पण कर्मचारीच मुख्यालयी राहत नसल्याने अनेक ठिकाणी ही केंद्रे केवळ इमारतीपुरती मर्यादित राहिली आहेत. गंभीर रुग्णांना उपचारासाठी थेट माहूर गाठावे लागते. त्यातच खराब रस्ते, वेळेत न मिळणारी वैद्यकीय मदत आणि कर्मचारी अनुपस्थितीमुळे अनेकांना जीव गमवावा लागत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून होत आहे.

शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा दुवा असलेले तलाठी गावात क्वचितच दिसतात. एखादे प्रमाणपत्र, फेरफार किंवा महसुली काम असेल तर नागरिकांना माहूर शहरात चकरा माराव्या लागतात. मात्र अनेकदा तलाठी माहूरमध्येही उपलब्ध नसल्याने नागरिक संताप व्यक्त करीत आहेत. कृषी विभाग माहूर मध्ये पांढरा हत्ती बनून उभा आहे. त्यांचे अधिकारी महाराजस्व अभियाना सारख्या महत्वाकांशी कार्यक्रमाला लोकप्रतिनिधी उपस्थित असताना गैर हजर असतात. त्यामुळे त्याच्यावर कोणाचेच वचक नाही हे सिद्ध होते. ग्रामविकासाचा कणा समजला जाणारा ग्रामसेवकही बैठकीपुरताच मर्यादित असल्याची चर्चा गावागावांत आहे. बैठकीनंतर त्यांचे दर्शन दुर्मिळ होते. परिणामी विकासकामांचा वेग मंदावला असून अनेक योजना कागदावरच अडकल्या आहेत. बहुतांश कर्मचाऱ्यांकडे चारचाकी वाहने असल्याने ते शहरात राहूनच तालुक्याचा कारभार पाहत असल्याची चर्चा आहे. धक्कादायक बाब म्हणजे काही कर्मचारी मुख्यालयी राहत असल्याचे दाखवून शासनाकडून घरभाडे भत्ताही उचलत असल्याचा आरोप होत आहे. जर याची चौकशी झाली तर मोठे गौडबंगाल समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**पंतप्रधानांच्या आवाहनाला केराची टोपली?**

देश इंधन बचतीचा संदेश देत असताना माहूरमध्ये मात्र रोज शेकडो किलोमीटरचा प्रवास करून सरकारी यंत्रणा चालवली जात आहे. दुर्गम भागातील नागरिकांच्या अडचणींकडे दुर्लक्ष करून सुरू असलेल्या या अप-डाऊन संस्कृतीवर प्रशासन कारवाई करणार का? की पंतप्रधानांचे आवाहनही फक्त भाषणापुरतेच राहणार? असा संतप्त सवाल आता नागरिक विचारू लागले आहेत.

## आसना ब्रीज जवळ चार गुन्हेगारांना अटक

नांदेड/प्रतिनिधी-आसना ब्रीज रोडवर दरोडा टाकण्याच्या तयारीत असणाऱ्या चार जणांना विमानतळ पोलीसांनी सोमवारी मध्यरात्री अटक केली आहे. गजानन वानखेडे रा.हदगाव, राहुल माथेकर रा. मालेगाव, रोहन निळकंठे रा. नांदेड, शैलेष बन्नाजी कांबळे रा.मालेगाव हे सर्वजण दरोडा टाकण्याच्या तयारीत असतांना पोलीसांनी अटक करुन त्यांच्या जवळून २ लाख रुपयांचा ऐवज जप्त केला आहे.




नांदेड जिल्हा अभिवक्ता संघाच्या निवडणुकीत यदुपथ अर्धापूरकर यांच्या नेतृत्वाखाली एकता पॅनलने विजय मिळविला आहे. निवडणूक निकालानंतर विजयी उमेदवारांनी गुलाल उधळून जल्लोष साजरा केला.

# राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये १६८० प्रकरणे निकाली

## ७ कोटीं ६८ लाख रुपयांची तडजोड

नांदेड/प्रतिनिधी-महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या आदेशान्वये आणि प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष नरेंद्र के. ब्रह्मे यांच्या अध्यक्षतेखाली शनिवार ९ मे, २०२६ रोजी जिल्ह्यातील सर्व न्यायालायात राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते.

या राष्ट्रीय लोकअदालती मध्ये मोटार अपघात नुकसान भरपाईची प्रकरणे, दिवाणी व फौजदारी तडजोड पात्र प्रकरणे, कौटुंबिक वाद प्रकरण, एन.आय. ॲक्टची प्रकरणे, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची वाद पूर्व मालमत्ता कराची प्रकरणे, गुन्हा कबुलीची प्रकरणे, आरटीओ व रेल्वे पोलीस विभागाची प्रकरणे, कौटुंबिक न्यायालय, कामगार न्यायालय, सहकार न्यायालय, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच प्रकरणे, सर्व बॅंक प्रकरणे, फाईनान्स कॅंमनीची प्रकरणे, पंचायत समिती कर वसुली व दाखलपूर्व प्रकरणे, बि.एस.एन.एल. कॅंमनी प्रकरणे, एम.एस.ई.डी.सी.एल. कॅंमनी ईत्यादी प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्या करीता जिल्हयात एकुण ३० पॅनल तयार करण्यात आले होते.शनिवार ९ मे रोजी झालेल्या लोक न्यायालयात नांदेड जिल्ह्यातील न्यायालयातील प्रलंबीत एकुण ११ हजार ७०४ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी ७१९ प्रकरणे निकाली व जवळपास ५ कोटी ३३ लाख ८८ हजार ८२३ रुपयांचे तडजोड मुल्य होते. मालमत्ता थकबाकी व पाणीपट्टी तसेच दाखलपुर्व दावे ९६१ प्रकरणे निकाली निघाली त्याचे २ कोटी ४४ लाख ६ हजार ४९७ रुपयांचे तडजोड मुल्य होते. असे एकूण १६८० प्रकरणे निकाली निघाली आणि तडजोड मुल्य ७ कोटी ६८ लाख ४९ हजार ३२० रूपये एवढे आहे.विषेष म्हणजे ३० लाख रूपयेचे दिवाणी प्रकरण या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये निकाली निघाले.जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव शरद जी. देशपांडे यांनी राष्ट्रीय लोकअदालती-साठी सहभागी झालेल्या सर्व पक्षकार, न्यायाधीश वर्ग, कर्मचारी वर्ग त्या सर्वांचे मनःपुर्वक आभार मानले.

# एकच व्यक्ती तेलंगणा व महाराष्ट्र राज्याचा लाभार्थी

## नांदेड जिल्हा मजूर फेडरेशनचा सदस्य

## कारवाई करण्याची स्वामी मूतपेल्लीवार यांची मागणी

नांदेड/प्रतिनिधी-जिल्हा मजूर फेडरेशनचा सदस्य असलेला एकच व्यक्ती तेलंगणा व महाराष्ट्र राज्यांमध्ये रहिवासी असल्याचे दाखवीत दोन्ही राज्यातील योजनांचा लाभ घेत आहे. एकाच व्यक्तीचा दोन राज्यांमध्ये स्वतंत्र आधार कार्ड, पॅन कार्ड व मतदार यादीमध्ये समावेश आहे. अशाप्रकारे शासनाची फसवणूक करणाऱ्या व्यक्तीवर कारवाई करण्याची मागणी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्याकडे स्वामी मुतपेल्लीवार यांनी केली आहे.

महाराष्ट्र राज्यातील बंजारा समाज तेलंगाना राज्यामध्ये अनुसूचित जमातीतील लबाना समाज म्हणून ओळखला जातो. नांदेड जिल्ह्यातील धूपसिंग मागासवर्गीय मजूर सहकारी संस्था कोटंबा तालुका किनवटचे चेअरमन उत्तम धूपसिंग राठोड (देवशोत) नांदेड जिल्हा मजूर फेडरेशनचे सदस्य आहेत. तेलंगाना राज्यांमध्ये अनुसूचित जमातीच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी सहकुटूंब मंजूळानगर ता.निर्मल तेलंगाना राज्य व नांदेड महाराष्ट्रातील मानसिंग तांडा ता.किनवट येथील स्वतंत्र आधार कार्ड, पॅन कार्ड व प्रॉपर्टीसह दोन्ही राज्यातील मतदार यादीत अधिकृत समावेश आहे. तेलंगाना व महाराष्ट्र राज्याच्या मतदार यादीसह दोन्ही राज्यांमध्ये अधिकृत स्वतंत्र आधार कार्ड, पॅन कार्ड व इतर कागदपत्रे तयार करून या व्यक्ती व कुटुंबाने शासनाची फसवणूक केली आहे असे सकृतदर्शनी दिसते. त्याचबरोबर तेलंगानाचे रहिवासी असताना महाराष्ट्रातील नांदेड जिल्हा मजूर फेडरेशनचे सदस्य झाले आहेत. या बाबीची चौकशी करून संबंधितांवर योग्य कारवाई करण्याची मागणी स्वामी नरसिंमलू मूतपेल्लीवार यांनी जिल्हाधिकारी व जिल्हा निबंधक यांच्याकडे केली आहे.

## खंजर व तलवार बाळगणाऱ्यांना अटक

नांदेड/प्रतिनिधी-तलवार व खंजर जवळ बाळगणाऱ्या दोन जणांना नांदेड ग्रामीण पोलीसांनी अटक केली आहे.

सोमवारी सकाळी शेख आसिफ शेख हसन (वय २३) रा.हिम्मतपूर,नांदेड हा खंजर घेवून फिरत असतांना टापरे चौकात पोलीसांनी ताब्यात घेतले. तसेच धनेगाव येथील कापुस संशोधन केंद्राजवळ शेख सोहेल शेख अली (वय २५) रा.हिम्मतपूर हा तलवार घेवून संशयास्पदरित्या फिरत असतांना पोलीसांनी अटक केली. दोघांविरुध्द नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# हदगाव-हिमायतनगर तालुक्यातील अतिक्रमित रस्ते तात्काळ मोकळे करा-आ.कोहळीकर

हदगाव/प्रतिनिधी-मुख्यमंत्री बळीराजा शेत पांदण रस्ते योजनेअंतर्गत हदगाव व हिमायतनगर तालुक्यातील अतिक्रमित शेतपांदण रस्ते तात्काळ मोकळे करून शेतकऱ्यांच्या वापरासाठी उपलब्ध करून द्यावेत, असे स्पष्ट निर्देश आ.बाबुराव कदम कोहळीकर यांनी संबंधित प्रशासनाला दिले.



हदगाव येथे आ.बाबुराव कदम कोहळीकर यांच्या अध्यक्षतेखाली दोन्ही तालुक्यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. बैठकीदरम्यान हदगाव व हिमायतनगर तालुक्यातील एकही शेत पांदण रस्ता अतिक्रमणाखाली राहू नये, यासाठी प्रशासनाने समन्वयाने तातडीने कार्यवाही करावी, असे निर्देश देण्यात आले. शेतकऱ्यांकडून प्राप्त झालेल्या तक्रारींची गंभीर दखल घेत संबंधित सर्व प्रकरणांमध्ये अतिक्रमित रस्ते त्वरित खुले करण्याचे आदेश देण्यात आले. यासाठी उपविभागीय अधिकारी, दोन्ही तालुक्यांचे तहसीलदार, पोलीस प्रशासन तसेच भूमी अभिलेख विभागाच्या अधिकाऱ्यांना कडक सूचना करण्यात आल्या. बैठकीस उपविभागीय अधिकारी, हदगाव व हिमायतनगरचे तहसीलदार, गटविकास अधिकारी, पोलीस निरीक्षक, भूमी अभिलेख अधिकारी तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. प्रशासनाने परस्पर समन्वय राखून प्रलंबित अतिक्रमण हटविण्याची मोहीम गतीने पूर्ण करावी, अशा सूचनाही यावेळी देण्यात आल्या. मुख्यमंत्री बळीराजा शेत पांदण रस्ते योजनेमुळे शेतकऱ्यांना शेतापर्यंत जाण्यास सुलभ मार्ग उपलब्ध होणार असून कृषी विकासाला मोठी चालना मिळेल, अशी अपेक्षाही बैठकीत व्यक्त करण्यात आली.

# गंगाबाई पाटील मैलापुरे यांचे निधन



देगलूर/प्रतिनिधी-ठाणा ता. मुखेड येथील प्रतिष्ठित महिला नागरिक श्रीमती गंगाबाई व्यंकटराव पाटील मैलापुरे ठाणेकर (वय ८५) यांचे मंगळवार दि.१२ मे रोजी पहाटे तीन वाजता दीर्घ आजाराने ठाणा येथील निवासस्थानी दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, नातु, पणंतु असा मोठा परिवार आहे. शासकीय कंत्राटदार संजय पाटील ठाणेकर, संभाजी पाटील ठाणेकर यांच्या त्या मातोश्री होत.

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ७ वे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, नांदेड
यांच्या न्यायालयात
(समक्ष : ए.जी.चव्हाण)
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.४८२/२०२६

अर्जदार : १. रुक्मीनबाई भ्र.बालाजी सगर वय : ५५ धंदा : घरकाम, २. पुजा भ्र.साईनाथ मदावाड पुजा पि.बालाजी सगर वय : ३१ धंदा : घरकाम, दोघेही रा.नाथ नगर, तरोडा बु.नांदेड ता.जि.नांदेड, ३. स्वाती सुजित सगर स्वाती पि.बालाजी सगर वय : ३६ धंदा : घरकाम रा.रामनगर उमरगा, ता.उमरगा जि.उस्मानाबाद, ४. प्रिति भ्र.आनंदा चिंतेवाड प्रिती पि.बालाजी सगर वय : ३५ धंदा घरकाम रा.देरेगाव ता. नायगाव जि.नांदेड

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : कलम २ व ३ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट नुसार वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र.१ ही पत्नी आहे २ ते ४ ह्या मयताच्या मुली आहेत. मयत नामे बालाजी पि.गोविंदराव सगर यांचा मृत्यू दि.२३/०३/२०२५ रोजी झालेला आहे.

वर नमुद अर्जदाराशिवाय ईतर कोणीही मयतांचे कायदेशीर वारस नसल्याचे अर्जदारांनी अर्जात कथन केले आहे. अर्जदारांनी मा. न्यायालयात अर्जदारांच्या नावे वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदारांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः हजर राहून या न्यायालयात दि.१७/०६/२०२६ रोजी किंवा हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक ०५/०५/२०२६ रोजी माझ्या सहीने व मा.न्यायालयाच्या शिक्क्याने दिला.

आदेशावरुन

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,नांदेड

स्वाक्षरित/-
**स.अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर,
नांदेड

## जाहीर समन्स

नांदेड येथील मे.न्यायाधीश,सहकार न्यायालय,नांदेड यांचे न्यायालयात
वादी :- नांदेड जिल्हा रुग्णालय व आरोग्य कर्मचारी सहकारी पतसंस्था, म.ता.जि.नांदेड मार्फत सचिव

विरुद्ध

प्रतिवादी :- हसनखान लालखान पठाण,रा.डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय विद्यालय आणि दवाखाना,विष्णुपुरी,नांदेड,ता.जि.नांदेड

| अ. क्र. | सहकार केस नं. | प्रतिवादी | दावा रक्कम रुपये | पुढील तारीख |
|---|---|---|---|---|
| १. | सी.सी.एन./१५४/२०२५ | १.हसनखान लालखान पठाण, रा.डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय विद्यालय आणि दवाखाना, विष्णुपुरी,नांदेड ता.जि.नांदेड | रु.४,९०,९१४/- | दि.१७/०६/२०२६ |

ज्याअर्थी, वादी यांनी आपले विरुध्द या न्यायालयात दावा दाखल केलेला आहे. त्याअर्थी या जाहीर समन्स/नोटीसद्वारे आपणास असे सूचित करण्यात येते की, आपण व्यक्तीशः अथवा योग्य रितीने अधिकार प्रदान करण्यात आलेला अधिकृत प्रतिनिधी, जो या दाव्याच्या संदर्भातील सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे देवू शकेल अशा अधिकृत प्रतिनिधीमार्फत या न्यायालयामध्ये दि.१७/०६/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता आपल्या विरुद्ध करण्यात आलेल्या दाव्याच्या संदर्भात आपले म्हणणे मांडण्यासाठी व पुरावे दाखल करण्यासाठी हजर राहावे.

उपरोक्त उल्लेखित तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास सदरील दाव्याचा निकाल आपले गैरहजेरीमध्ये करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. सदर जाहीर समन्स हे मा.न्यायाधीश यांच्या दि.२०/०४/२०२६ रोजीच्या हुकूमान्वये दिले आहे.

स्वाक्षरित/-
**न्यायालयीन लिपीक,**
सहकार न्यायालय,नांदेड.

स्थळ :- न्यायाधीश,सहकार न्यायालय,नांदेड.
''श्री देवाशिष'' कॉम्प्लेक्स,स्टेट बॅंक ऑफ इंडिया समोर,
डॉ. लेन समोर,नांदेड-४३१६०१

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील दुसरे सह दिवाणी न्या.क.स्तर नांदेड यांच्या न्यायालयात
समक्ष श्री.डी.एस.निंबाळकर साहेब २ रे सह.दि.न्यायालय क.स्तर
किरकोळ अर्ज क्र.७०४/२०२६
बानो बेगम व ईतर वि.निरंक

१. बानो बेगम भ्र.जमील खाँन,वय ६० वर्ष, धंदा-घरकाम, मो.नं.९१७५४२४०६६, २. अखील खाँन पि.जमील खाँन, वय ३५ वर्ष, धंदा-व्यापार, ३. अलताफ खाँन पि.जमील खाँन, वय २८ वर्ष, धंदा-व्यापार, मो.नं.७३८७८१९९७७ सर्व राह.घर क्र.९-७-१५३३, रहेमतनगर, देगलूर नाका,नांदेड-४३१६०४

दावा : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र अर्ज केला आहे. ज्याअर्थी अर्जदार मयत जमील खाँन पि.हमीद खाँन यांचे वारस आहेत. मयत जमील खाँन पि.हमीद खाँन यांचा मृत्यू दिनांक १६/०६/२०२५ रोजी झाला.

अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराशिवाय कोणीही मयताचे वारस नाहीत. अर्जदार यांनी मान्यवर न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः न्यायालयात दिनांक १७/०६/२०२६ रोजी किंवा एक महिन्यामध्ये नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक ११/०५/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**क.लिपीक**
२ रे सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**स.अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड

जा.क्र.नांवाशमनपा/क्षे.का.क्र.४/१४१/२०२६
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड.
दिनांक : ११/०५/२०२६

## जाहीर प्रगटन

**संचिका क्रं.०९/४०/२०२६-२७**

**प्रकरण : नांव परिवर्तन करणे बाबत.**

या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, १.श्री **संजय द्वारकादास लाहोटी, २. श्री.रमण ओमप्रकाश तोष्णीवाल** रा.**सोमेश कॉलनी,**नांदेड यांनी कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, सिटी सर्व्हे नं.**३६९१** दिनांक **१६.०३.२०२६** अन्वये प्लॉट क्र.**--** ज्याचा महानगरपालिका मालमत्ता नं.**२-९-३९९** पिन क्र. **४०४०२०२५६३** यांचे क्षेत्रफळ **१११.३१** चौ.मी. असुन श्री. **गणेश तुकाराम पटाईत** यांचे नांवे असलेली मालमत्ता यांचे कडून अर्जदाराने खरेदी खत क्र.**१०३४०** दिनांक **२९.११.२०२५** च्या आधारे विकत घेतलेली आहे/वारसा हक्क प्राप्त झालेली आहे. तरी त्यांचे नांवे कर आकारणी नोंदवही घेण्यात येत आहे.

तरी या संबंधात कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी हे पत्रक प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन (०७) दिवसाच्या आत या कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासहीत दाखल करावा. नसता वरील अवधी संपल्यानंतर अर्जदारांच्या नावाने वरील प्रमाणे मालमत्ता नोंद घेण्यास येईल.

स्वाक्षरित/-
**सहाय्यक आयुक्त**
क्षेत्रिय कार्यालय क्रं.४ वजीराबाद
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

# महाराणा प्रताप चौक ते जाधव हास्पिटल पर्यंतच्या रस्त्याची दैनिय अवस्था

## एखाद्याचा बळी गेल्यावरच सार्वजनिक बांधकाम विभागाला जाग येणार का?




कंधार/प्रतिनिधी-कंधार शहरातील महाराणा प्रताप चौक ते जाधव हास्पिटल पर्यंतच्या व लाईट ऑफिस ते मुखेड फाटा या रस्त्याची दैनिय अवस्था झाली आहे. याकडे सर्वच जन राजकीय दृष्टीने पाहात असल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

आमदार महोदय तर नगराध्यक्ष दुसऱ्या पक्षाचा निवडून दिला असल्याने कंधार शहराकडे लक्ष न देण्याची शफथच घेतली आहे की काय असा प्रश्न निर्माण झाला आहे. आमदार महोदय हे मात्र विसरुन गेले आहेत की, शहरातील जनतेनी आपले दहा नगरसेवक व नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारांना भरभरून मतदान केलं आहे. विधानसभा निवडणूकीत ही शहरातील जनतेनी मतदान केल्याचाही विसर आमदार महोदयांना पडल्याचा दिसत आहे. आमदारांचे जाऊ द्या परंतु सार्वजनिक बांधकाम विभागाला सुध्दा मोतीबिंदू झाला आहे. आपल्या कार्यालया मार्फत कामे करण्याचा अधिकार आहे का? नाही हा खरा प्रश्न जनतेला पडला आहे. एखाद्याचा बळी गेल्यावरच सार्वजनिक बांधकाम विभागाला जाग येणार का? असा संतप्त सवाल जनता करत आहे. कंधार शहरातील महाराणा प्रताप चौक ते जाधव हास्पिटल पर्यंतचा रस्ता व लाईट ऑफिस ते मुखेड फाटा पर्यंतचा रस्ता पुर्णपणे नाहीसा झाला आहे. या रस्त्याच्या संदर्भात अनेक बातम्या प्रसारित होत आहेत परंतु लोकप्रतिनिधी व सार्वजनिक बांधकाम विभाग महात्मा गांधीच्या तिन माकडा प्रमाणे भुमीका घेत आहेत. प्रत्येक निवडणुकीत कंधार शहरातील जनतेनी आमदार महोदयावर नेहमीच भरभरून प्रेम केलं आहे. नगर पालिका निवडणुकीत नगराध्यक्ष दुसऱ्या पक्षाचा निवडून दिला असल्याने आमदार महोदय कंधारला सावत्र वागणूक देत आहेत हे जगजाहीर दिसत आहे. जनतेनी निवडणुकीत लोकप्रतिनिधी निवडुन दिल्या नंतर तो लोकप्रतिनिधी एका पक्षाचा किंवा फक्त आपल्याच कार्यकर्त्याचा राहत नसून तो सर्व मतदार संघातील जनतेचा लोकप्रतिनिधी असतो. मतदार संघातील प्रत्येक समस्या सोडवण्याचे काम सर्वच लोकप्रतिनिधी चे काम असते. एखाद्या नगर पालिकेवर ढकलून दिल्याने चालत नाही याचे कुठेतरी आत्मचिंतन होण्याची काळाची गरज आहे.

कंधार शहर हे ऐतिहासिक शहर आहे परंतु हे शहर आता नावालाच ऐतिहासिक राहिले आहे. पर्यटन स्थळ करणे तर सोडाच परंतु साधे रस्ते सुद्धा करण्यासाठी राजकारण केले जात आहे. शहरातील प्रतिष्ठित नागरिकांना आमदार महोदयांना विनंती करुन ही कसलीच दखल घेतली जात नाही. सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकारी हे तर आमदारांचे सालगडीच झाले आहेत. साध्ये खड्डे बुजवायचे झाले तरी आमदाराची परवानगी घ्यावी लागते. अधिकाऱ्यांच्या हातचे काहीच राहीले नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाने तालुक्यात केलेल्या सर्वच रस्त्याची वाट लागली आहे. शहरातील विजयगड, संभाजी नगर, रमाई नगर, व शहरातील केलेले सिमेंट रस्ते तिन महिन्यात धुरळा झाले आहेत. काही गुत्तेदारांनी तर धंदाच चालू केला आहे. मंत्रालयातून टक्केवारी देऊन कामे आणायची आणि बोगस कामे करुन आपले खिसे भरायचे हाच प्रकार सध्या चालू आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे जबाबदार अधिकारीही गुत्तेदारीच्या पार्टनरशिपमध्ये कामे करत असल्याचे बोलल्या जात आहे. राजकारण बाजूला सारून कंधार शहरातील महाराणा प्रताप चौक ते जाधव हास्पिटल पर्यंतच्या व लाईट ऑफिस ते मुखेड फाटा या रस्त्याचे काम करणे अत्यंत गरजेचे आहे.

## पाणी टंचाई निवारणासाठी इसापूर धरणातून पाण्याचा विसर्ग



नांदेड/प्रतिनिधी-नांदेड व यवतमाळ जिल्ह्यातील पाणी टंचाईग्रस्त गावांना दिलासा देण्यासाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या निर्देशानुसार इसापूर धरण प्रकल्पातून पाणी सोडण्यात आले आहे. सर्व संबंधित गावातील ग्रामस्थांनी पाण्याचा वापर जपून व नियोजनपूर्वक करावा, असे आवाहन जलसंपदा विभागाने केले आहे.

नागरिकांनी कालवा, नाल्यातून बेकायदेशिर पाणी उपसा (पंपीग) करु नये व पाण्याची नासाडी टाळावी जेणेकरुन सर्व गावांना पाणी मिळणे सोयीस्कर होईल. पाणी टंचाई निवारणासाठी जलसंपदा विभाग कटिबध्द असून उर्वरित पाण्याचे नियोजन वेळापत्रका प्रमाणे केले जाईल, अशी माहिती उर्ध्व पैनगंगा प्रकल्प विभाग क्र. १ चे कार्यकारी अभियंता यांनी दिली आहे. ३० मार्च च्या आदेशान्वये नांदेड जिल्ह्यासाठी ३.०० दलघमी पाणी सोडण्यात आले आहे. तर यवतमाळ जिल्ह्यासाठी ४.०० दलघमी व १ मे २०२६ च्या आदेशान्वये ५.०० दलघमी पाणी सोडण्यात आले आहे.

## देगलूरमध्ये लग्नसराईत पालकांची आर्थिक कोंडी

### मंगल कार्यालयाची भाडेवाढ;तृतीयपंथीयांच्या दक्षिणेमुळे पालक वैतागले

देगलूर/प्रतिनिधी-यंदा देगलूर शहरात दरवर्षीपेक्षा लग्नसरायचे प्रमाण वाढले आहे. दोन महिन्याच्या या कालावधीत शहरात लग्न सोहळ्यांची मोठी लगबग दिसून आली. यामुळे आचारी, बँड पथक, फटाके विक्रेते, पुजारी तसेच इतर कामगारांना रोजगार मिळाला. मात्र या लग्नसराई दरम्यान काही मंगल कार्यालयाकडून मनमानी भाडे वसूल होत असल्याची चर्चा वधू-वरांच्या पालकातून व्यक्त होत आहे.

देगलूर शहरात डझनभर मंगल कार्यालय उपलब्ध असतानाही अनेक ठिकाणी मूलभूत सुविधांचा अभाव असल्याची तक्रार आहे.काही मंगल कार्यालयात स्वयंपाकासाठी स्वतंत्र जागा नसल्याने भांडी, साहित्य व इतर सुविधा बाहेरून आणाव्या लागत असल्याचे पालकांचे म्हणणे आहे. केवळ छत असलेल्या स्वभावासाठीही ज्यादा दर आकारले जात असल्याने सर्वसामान्य कुटुंबावर आर्थिक ताण येत असल्याची भावना व्यक्त होत आहे. पाऊस, वारा व उन्हापासून बचाव व्हावा म्हणून मंगल कार्यालयाकडची निवड केली जाते.परंतु अपेक्षित सुविधा मिळाल्या नसताना पालकांना अतिरिक्त खर्च करावा लागत आहे. या परिस्थितीत काही मंगल कार्यालयाकडून भाडेदाराबाबत स्पष्ट दर पत्रक नसल्याने मनमानी होत असल्याचा आरोप केला जात आहे. दरम्यान लग्न सोहळा दरम्यान तृतीयपंथीयाकडून उपस्थित राहून ठराविक रकमेपेक्षा अधिक दक्षिणा मागत असल्याचे तक्रार आहे. काही ठिकाणी स्टेजवर जाऊन गोंधळ घालण्याच्या प्रकारामुळे पाहुण्यासमोर वधू-वरांचे फार हतबल होत असल्याचे सांगितले जाते. परिणामी मानसिक ताना सोबतच अनेक आर्थिक भार सहन करावा लागत असल्यास भावना व्यक्त केले जात आहे. या सर्व पार्श्वभूमीवर मंगल कार्यालयाच्या भाडे दरात पारदर्शकता आणावी.आवश्यक्य सुविधा बंधनकारक कराव्यात तसेच लग्न समारंभात होणाऱ्या आवास्तव मागणीच्या प्रकारावर प्रशासनाने लक्ष द्यावे अशी मागणी देगलूर शहर व तालुक्यातील वधू-वरांच्या पालकातून होत आहे.

## वंशावळीत नसलेल्या नोंदींवर समितीचा भर;नागपूर खंडपीठाचे कठोर ताशेरे

उमरखेड/प्रतिनिधी-मरखेड अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या कार्यपद्धतीवर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने कठोर ताशेरे ओढत उमरखेड येथील पत्रकार लक्ष्मीकांत महादेव नंदनवार यांना मोठा दिलासा दिला आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात रिट याचिका क्र.४५३९/२०११ मध्ये दाखल केलेला अर्ज न्यायालयाने, समितीने २ डिसेंबर २०१९ रोजी दिलेला आदेश रद्द करून चार आठवड्यांच्या आत हलबीअनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र देण्याचे निर्देश दिले.उमरखेड येथील पत्रकार लक्ष्मीकांत नंदनवार यांनी २०११ मध्ये जात पडताळणीसाठी अर्ज दाखल केला होता. मात्र समितीने विविध कारणे देत त्यांचा दावा फेटाळला. सुनावणी दरम्यान न्यायालयाच्या निदर्शनास आले की, समितीने हुकाजी लक्ष्मण, कौसल्या नारायण आणि नागबाई नारायण या व्यक्तींच्या नोंदींवर अवलंबून निर्णय दिला होता. या व्यक्ती याचिकाकर्त्याच्या वंशावळीत नसल्याचे स्पष्ट झाल्यानंतरही समितीने त्या नोंदींचा आधार घेतल्याबद्दल न्यायालयाने नाराजी व्यक्त केली. प्रकरणातील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे ३ एप्रिल १९४७ चा जुना दस्तऐवज. त्यामध्ये याचिकाकर्त्याच्या आजोबांची जात हलबी अशी नमूद असल्याचे न्यायालयाने नोंदविले. तसेच वडिलांच्या शाळा दाखल्यातही हलबी नोंद असल्याचे स्पष्ट झाले. पुरेसे जुने दस्त ऐवजी पुरावे असताना केवळ अफिनिटी टेस्टवर अवलंबून राहणे योग्य नसल्याचे न्यायालयाने नमूद केले. न्यायमूर्ती एम. एस. जवळकर आणि न्यायमूर्ती नंदेश एस. देशपांडे यांच्या खंडपीठाने समितीचा आदेश कायद्याच्या कसोटीवर टिकत नसल्याचे सांगत तो रद्द केला. याचिकाकर्त्यांच्यावतीने ॲड. अश्विन देशपांडे आणि ॲड. राशी नगराळे यांनी प्रभावी युक्तिवाद केला. पंधरा वर्षांच्या कायदेशीर लढ्यानंतर अखेर न्याय मिळाला, अशी प्रतिक्रिया लक्ष्मीकांत नंदनवार यांनी व्यक्त केली.

## कंत्राटी सफाई कामगारांना सेवेत कायम करण्याची मागणी



नांदेड/प्रतिनिधी-नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत २०११ पासून कंत्राटी पद्धतीने कार्यरत असलेल्या सफाई कामगारांना सेवेत कायम करण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात कामगारांनी माजी आमदार तथा भाजप महानगराध्यक्ष अमरनाथ राजूरकर यांना निवेदन दिले.

निवेदनात म्हटले आहे की, गेल्या अनेक वर्षांपासून हे कर्मचारी कंत्राटी सफाई कामगार म्हणून सेवा बजावत आहेत. ऊन, पाऊस तसेच कोरोना महामारीसारख्या कठीण काळातही त्यांनी शहर स्वच्छतेचे काम प्रामाणिकपणे केले. मात्र, अद्यापही त्यांना कायम सेवेत सामावून घेण्यात आलेले नाही. प्रशासनाने कामगारांच्या सेवेकडे सकारात्मक दृष्टीने पाहून त्यांना कायम सेवेत सामावून घ्यावे, अशी मागणी केली आहे. तसेच यासाठी शासन आणि प्रशासन स्तरावर पाठपुरावा करण्याची विनंतीही माजी आ.अमरनाथ राजूरकर यांच्याकडे करण्यात आली.या निवेदनावर अनेक कंत्राटी सफाई कामगारांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## खताचा काळा बाजार करणाऱ्या व्यापाऱ्या विरुद्ध गुन्हा दाखल

नांदेड/प्रतिनिधी-खताचा काळा बाजार करुन शासनाची फसवणूक करणाऱ्या माळकौठा ता.मुदखेड येथील शिवकृपा विकास केंद्राचे मालक माधव हाळे यांच्या विरुध्द मुदखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शिवकृपा विकास केंद्र येथे युरिया व डीएपी खताच्या विक्रीची कोणत्याही प्रकारचे कागदपत्र तयार केली नाहीत. तसेच तपासणीमध्ये दाखविली नाही. शासनाच्या अनुदानित रासायनिक खताचा अवैधरित्या काळ्या बाजारात विक्री करुन शासनाची व शेतकऱ्याची फसवणूक केल्याचे चौकशीत निष्पन्न झाले. कृषी विभागाच्या गुण नियंत्रण कार्यालयातील अधिकारी प्रमोद हिल्लापुरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मुदखेड पोलीस ठाण्यात माधव हाळे यांच्या विरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरिक्षक श्री.चव्हाण हे करीत आहेत.

## अल्पवयीन मुलीचा शोध घेवून पोलिसांनी सुखरुप पालकांच्या दिले ताब्यात

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर तालुक्यातील एका अल्पवयीन मुलीचा शोध घेण्यात मरखेल पोलिसांना मोठे यश आले असून, संबंधित मुलीला हैदराबाद येथून सुखरूप ताब्यात घेऊन पालकांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. देगलूर तालुक्यातील फिर्यादी यांनी आपल्या अल्पवयीन मुलीला कोणीतरी फूस लावून पळवून नेल्याची तक्रार मरखेल पोलीस ठाण्यात दाखल केली होती. याप्रकरणी गुन्हा क्रमांक ५९/२०२६ कलम १३७(२) बीएनएस अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला होता. मरखेल पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रवी हुंडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने गोपनीय व तांत्रिक माहितीच्या आधारे शोधमोहीम सुरू केली.या तपासात पोलीस उपनिरीक्षक विलास पवार यांनी तपासाची सूत्रे वेगाने हलवली. त्यांच्या नेतृत्वाखाली पोलीस कर्मचारी तेलंग, नारायण यंगाले, संदीप बोडमवाड तसेच सायबर सेल नांदेडच्या पथकाने तांत्रिक माहितीच्या आधारे हैदराबाद येथे जाऊन संबंधित अल्पवयीन मुलगी आरोपीसह आढळून आली. मुलीला सुखरूप ताब्यात घेत पालकांच्या स्वाधीन केले.


## जिल्हा परिषद नांदेड

### जिल्हा परिषद,बांधकाम विभाग नांदेड यांचे कार्यालय

जाक्र/जिपनां/बांविन/नियोजन/निविदा/३३८/२०२६ दिनांक - ११/०५/२०२६

### ई-निविदा सूचना क्र.१९ सन २०२५-२०२६

जिल्हा परिषद,बांधकाम विभाग नांदेड अंतर्गत एकूण ६ कामे एकत्रित (१८ कामे) कामाची ई निविदा सूचना क्रमांक १९ जिल्हा परिषदेसाठी पात्र नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खुला कंत्राटदार साठी कामाची निविदा ई निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवीत आहेत. निविदा संबंधी सर्व आवश्यक कागदपत्र, जाहिरात व निविदा अटी शासनाच्या (https:mahatenders.gov.in) या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार निविदा समिती जि.प.नांदेड यांनी राखून ठेवला आहे.

स्वाक्षरित/-
**कार्यकारी अभियंता**
जिल्हा परिषद,बांध.विभाग नांदेड


पान १ वरुन

### पंतप्रधान मोदींच्या आवाहनांवर...

आहे. या परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन पंतप्रधानांनी स्वतःच्या अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय बैठक बोलवावी. राष्ट्रीय हिताच्या प्रश्नांवर सर्व पक्षीय नेत्यांना विश्वासात घेऊन निर्णय प्रक्रिया राबविणे अत्यंत आवश्यक आहे. सध्याच्या आंतरराष्ट्रीय घडामोडी लक्षात घेता केंद्र सरकारने अधिक संवेदनशीलता आणि व्यापक सल्लामसलत यांना प्राधान्य द्यावे.तसेच, देशातील नामवंत अर्थतज्ज्ञ, उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी आणि संबंधित तज्ज्ञांची तातडीने बैठक घेऊन परिस्थितीचा सखोल आढावा घ्यावा, अशी मागणीही शरद पवार यांनी केली आहे. देशातील जनतेमध्ये विश्वास आणि स्थैर्य निर्माण करणे हेच सध्याच्या घडीला सरकारचे सर्वोच्च प्राधान्य असले पाहिजे, असेही त्यांनी स्पष्टपणे नमूद केले.

पान १ वरुन

### पेपरफुटीमुळे नीट परीक्षा...

विद्यार्थ्यांनी वर्षभर केलेल्या मेहनतीनंतर परीक्षा दिली होती. काही विद्यार्थ्यांचा पेपर अत्यंत चांगला गेला होता. मात्र आता त्यांनाही पुन्हा तयारी करावी लागणार असल्याने मानसिक ताण वाढला आहे.पेपरफुटीविरोधात दिल्लीसह विविध शहरांमध्ये विद्यार्थ्यांनी आंदोलन छेडले होते. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ थांबवा अशी मागणी करत निषेध व्यक्त करण्यात आला. वाढत्या दबावानंतर अखेर परीक्षा रद्द करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला. सध्या नव्या परीक्षेची तारीख अधिकृतपणे जाहीर करण्यात आलेली नाही. मात्र, तपास पूर्ण झाल्यानंतर लवकरच नव्या वेळापत्रकाची घोषणा केली जाईल, अशी माहिती सूत्रांकडून मिळत आहे. त्यामुळे लाखो विद्यार्थी आणि पालक आता नव्या तारखेच्या प्रतीक्षेत आहेत.

### नांदेडसह राज्यात...

उष्माघाताच्या रुग्णसंख्येत वाढ होण्याची शक्यता आरोग्य विभागानेही व्यक्त केली आहे.दरम्यान, नागरिकांनी दुपारच्या वेळेत घराबाहेर पडणे टाळावे, भरपूर पाणी पिणे, हलका आहार घेणे तसेच डोके झाकून बाहेर पडावे, असा सल्ला प्रशासनाकडून देण्यात आला आहे. वृद्ध, लहान मुले आणि आजारी व्यक्तींनी विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### 'त्या'दोन चिमुकल्या बहिणींचा...

रुग्णालयात दाखल केल्यास वेळेत उपचार मिळून रुग्णाचा जीव वाचू शकतो. गोकुंद्रा स्थित उपजिल्हा रुग्णालयात औषधी उपलब्ध असल्याचेही डॉ.केंद्रे यांनी सांगितले.

**अशाही वेळी अकारण आकांडतांडव...?**

सर्पदंश असो की, खाण्यातून झालेली विषबाधा आणि त्यातून दुर्दैवी मृत्यू असो, असे प्रसंग प्रत्येकांसाठी अगदी वेदनादायीच असतात. अशा परिस्थितीत काहींनी उपजिल्हा रुग्णालय प्रशासनावर जेवढे आसूड ओढता येतील तेवढे ओढल्याचे पहायला मिळाल्याचे सर्वश्रुत आहे. औषधी उपलब्ध नाही आणि वैद्यकीय यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रसार माध्यमांतून रान पेटवल्यामुळे यातील तथ्यता जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता डॉ.केंद्रेंनी सर्पदंशविषयक पुरक प्रमाणात औषधी उपलब्ध आणि यंत्रणाही सजग असल्याचा निर्वाळा केलाय. सदोष यंत्रणा आणि औषधीचा तुटवडा असेल तर लोकहितावह सामाजिक जाणीवेतून शासन आणि प्रशासनावर आसूड ओढलेच पाहिजे. रुग्णकल्याण समितीलाही जाब विचारायला हवा, कारण ती समिती शासन व प्रशासनातील महत्त्वाचा दुवा असते. लोकप्रतिनिधींनीही किमान तीन महिन्यांला आढावा घेऊन अत्यावश्यक त्या गरजा पूर्ण करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करायला हवा. आमदार प्रदीप नाईकांच्या काळात बैठका लाऊन आढावा घेतला जात होता. अलीकडे अशा बैठका घेतल्याचे आणि प्रश्न मार्गी लावल्याचे पहायला मिळाले नाही. लोक गरजा, लोकभावना लक्षात घेता अशा बैठकांच अत्यंत उपयुक्त ठरतात हे विशेष.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४